सत्यमेव जयते

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

ई-मेलः fra.govmh@gmail.com
संकेतस्थळः www.mahafra.org
दूरध्वनीः ०२२-३११९८०३४८ / ८८२८७८६२६४

## शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त

**दिनांक : २६.०३.२०२५**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क नियमन) कायदा, २०१५ च्या कलम ११ (२)(३)(४) अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियमन प्राधिकरणाची बैठक दि.२६ मार्च, २०२५ रोजी बैठक रुम क्र.३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

**खालील सदस्य उपस्थित / अनुपस्थित होते :**

| | | |
|---|---|---|
| १ | माननीय न्यायाधीश व्ही.एल.अचलिया (निवृत्त)<br>अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| २ | डॉ.विजय वसंत खोले<br>मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ३ | श्री.मनोज दामोदर चांडक<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ४ | श्री.नितीन बापुराव चव्हाण<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ५ | श्री.रत्नाकर (शिरीष) फडतरे<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री.अतुल दामोदर धारप<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ७ | श्री.ॲड.धर्मेंद्र दिलीप मिश्रा<br>व्यावसायिक शिक्षणतज्ञ,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ८ | संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण (म.रा.)<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| १० | आयुक्त वैद्यकीय शिक्षण (म.रा.)<br>पदासिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ११ | संचालक, आयुष (म.रा.)<br>पदासिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| १२ | महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे आणि पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| १३ | डॉ.अर्जुन चिखले, भा.प्र.से.<br>सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

**विषय क्र.१: दि.२० व २१ मार्च,२०२५ रोजी झालेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त निश्चित करण्याबाबत**

चर्चा झाली.

दि.२० व २१ मार्च, २०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले आणि मंजूर झाले.

**विषय क्र. २: शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्क मान्य नसलेल्या खाली नमूद केलेले अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांकडून प्राप्त झालेल्या पुनर्विलोकन अर्जांची सुनावणी घेणेबाबत.**

(१) **पुनर्विलोकन अर्ज क्र.९४/२०२४ (कोड क्र.एमबीबीएस०००९) पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेज, अहमदनगर** या संस्थेमध्ये चालविलेल्या एमबीबीएस अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केलेला होता.

खालील उपस्थित होते :

१. श्री.शशांक सुवर्णपारखी, सनदी लेखापाल

२. श्री.सुनिल म्हस्के, अधिष्ठाता

म्हणणे ऐकले.

सुनावणी दरम्यान उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने शपथपत्र व इतर कागदपत्रे सादर करण्याची सूचना देऊन पुढील सुनावणी दि.२७.०३.२०२५ पर्यंत तहकुब करण्यात आली.

(२) अ. **पुनर्विलोकन अर्ज क्र.१०४/२०२४ (कोड क्र.एमबीबीएस०००७) डॉ.पंजाबराव देशमुख मेमोरिअल मेडिकल कॉलेज, अमरावती** संस्थेमध्ये चालविलेल्या एमबीबीएस अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१. डॉ.देशमुख, अधिष्ठाता

म्हणणे ऐकले.

सुनावणी दरम्यान उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या पुष्टार्थ कागदपत्र सादर करण्याची सूचना देऊन पुढील सुनावणी दिनांक २७.०३.२०२५ पर्यंत तहकुब करण्यात आली.

(२) ब. **पुनर्विलोकन अर्ज क्र.१०४/२०२४ (कोड क्र.पीजी मेडिकल०००७) डॉ.पंजाबराव देशमुख मेमोरिअल मेडिकल कॉलेज, अमरावती** संस्थेमध्ये चालविलेल्या पीजी मेडिकल अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१. डॉ.देशमुख, अधिष्ठाता

म्हणणे ऐकले.

सुनावणी दरम्यान उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने कागदपत्र सादर करण्याची सूचना देऊन पुढील सुनावणी दिनांक २७.०३.२०२५ पर्यंत तहकुब करण्यात आली.

(३) **पुनर्विलोकन अर्ज क्र.११०/२०२४ (कोड क्र.एमबीबीएस०००६) एनकेपी साळवे इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲन्ड रिसर्च सेंटर, नापूर** संस्थेमध्ये चालविलेल्या पीजी मेडिकल अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१. श्री.राजीव शर्मा

म्हणणे ऐकले.

सुनावणीनंतर संस्थेच्या अधिका-यांनी पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची विनंती केली.

पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची परवानगी दिली. पुनर्विलोकन अर्ज मागे घेतल्याने निकाली काढण्यात आला आहे.

(४) **पुनर्विलोकन अर्ज क्र.१११/२०२४ (कोड क्र.एमबीबीएस०००३) एमआयएमईआर मेडिकल कॉलेज, तळेगाव, दाभाडे, पुणे** संस्थेमध्ये चालविलेल्या पीजी मेडिकल अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१. डॉ.सुचित्रा नागरे, महाविद्यालयाचे अधिष्ठाता

म्हणणे ऐकले.

सुनावणीनंतर संस्थेच्या अधिका-यांनी पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची विनंती केली.

पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची परवानगी दिली. पुनर्विलोकन अर्ज मागे घेतल्याने निकाली काढण्यात आला आहे.

(५) **पुनर्विलोकन अर्ज क्र.१२१/२०२४ (कोड क्र.एमबीबीएस००१६) बी के एल वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज, चिपळूण** संस्थेमध्ये चालविलेल्या पीजी मेडिकल अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१. श्री.अनिल पागे, सनदी लेखापाल

म्हणणे ऐकले.

सुनावणीनंतर संस्थेच्या अधिका-यांनी पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची विनंती केली.

पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची परवानगी दिली. पुनर्विलोकन अर्ज मागे घेतल्याने निकाली काढण्यात आला आहे.

(६) अ. **पुनर्विलोकन अर्ज क्र.१३१/२०२४ (कोड क्र.एमबीबीएस००११) गोदावरी फाऊंडेशनचे डॉ.उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, जळगाव** संस्थेमध्ये चालविलेल्या मेडिकल अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१.डॉ.प्रशांत सोळंकी, अधिष्ठाता

२. श्री.नारायण हर्डीकर, संचालक

म्हणणे ऐकले.

सुनावणीनंतर संस्थेच्या अधिका-यांनी पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची विनंती केली.

पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची परवानगी दिली. पुनर्विलोकन अर्ज मागे घेतल्याने निकाली काढण्यात आला आहे.

(६) ब. **पुनर्विलोकन अर्ज क्र.१३१/२०२४ (कोड क्र.एमबीबीएस००११) गोदावरी फाऊंडेशनचे डॉ.उल्हास पाटील मेडिकल कॉलेज, जळगाव** संस्थेमध्ये चालविलेल्या पीजी मेडिकल अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१.श्री.प्रशांत सोळंकी, अधिष्ठाता

२. श्री.नारायण हर्डीकर, संचालक

म्हणणे ऐकले.

सुनावणीनंतर संस्थेच्या अधिका-यांनी पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची विनंती केली.

पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची परवानगी दिली. पुनर्विलोकन अर्ज मागे घेतल्याने निकाली काढण्यात आला आहे.

(७) **पुनर्विलोकन अर्ज क्र.१०५/२०२४ (कोड क्र.बीएएमएस००३०) धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज, उदगीर, लातूर** संस्थेमध्ये चालविलेल्या आयुर्वेद अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१. श्री.ओमकार पाटील, कार्यालय अधिक्षक

२.डॉ.दत्ता पाटील, प्राचार्य

म्हणणे ऐकले.

आयुर्वेद अभ्यासक्रम चालविणा-या संस्थेने २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी शुल्क मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला. संस्थेने प्रति विद्यार्थी रुपये २,७६,०६८/-. शुल्क प्रस्तावित केले आहे आणि दावा केला आहे. दि.१२.०९.२०२४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत या प्रस्तावावर विचार करण्यात आला. प्रस्तावाच्या समर्थनार्थ सादर केलेल्या प्रस्तावाचा आणि पुराव्यांचा योग्य विचार करुन प्राधिकरणाने रुपये १,७५,०००/-. शुल्क मंजूर केले आहे. अमान्य होऊन संस्थेने पुनर्विलोकन अर्ज दाखल केला आहे.

संस्थेचे प्रतिनिधित्व करणा-या अधिका-यांचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि कागदपत्रांची छाननी केल्यानंतर पुनर्विचार अर्ज अंशतः मंजूर करण्यात यावे असे ठरविण्यात आले. संस्थेचे शुल्क खालीलप्रमाणे सुधारित केले आहे :

| पुनर्विलोकन अर्ज क्र | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केलेले सुधारित शुल्क |
|---|---|---|---|
| १०५/२०२४ | धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज, उदगीर, लातूर **कोड क्र.बीएएमएस००३०** | **आयुर्वेद** | १,८५,०००/- प्रति विद्यार्थी |

(८) **पुनर्विलोकन अर्ज क्र.१०८/२०२४ (कोड क्र.बीएएमएस००१७) श्रीमती कमलाबाई सी.अजमेरा आयुर्वेद महाविद्यालय, देवपूर, धुळे** संस्थेमध्ये चालविलेल्या आयुर्वेद अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१.श्री.प्रमोद नांदकर, लेखापाल

२.श्री.सुनिल शिंदे, लेखापाल

म्हणणे ऐकले.

सुनावणीनंतर संस्थेच्या अधिका-यांनी पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची विनंती केली.

पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची परवानगी दिली. पुनर्विलोकन अर्ज मागे घेतल्याने निकाली काढण्यात आला आहे.

(९) **पुनर्विलोकन अर्ज क्र.११५/२०२४ (कोड क्र.बीएएमएस०३१९९) शिवाजीराव** पवार आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज ॲन्ड **रिसर्च सेंटर, अहमदनगर** संस्थेमध्ये चालविलेल्या आयुर्वेद अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

**संस्थेने सुनावणी तहकुब करण्याबाबत विनंतीयुक्त ई-मेल या कार्यालयास पाठविले आहे. सदर कारण विचारात घेऊन सुनावणी तहकुब करण्यात आली आहे.**

(१०) **पुनर्विलोकन अर्ज क्र.११६/२०२४ (कोड क्र.बीएएमएस०३१८४) राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आयुर्वेद मेडिकल कॉलेज ॲन्ड रिसर्च सेंटर, अहमदनगर** संस्थेमध्ये चालविलेल्या आयुर्वेद अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१.डॉ.नारायण पाटील, प्राचार्य

२. श्री.कुंदे, सनदी लेखापाल

म्हणणे ऐकले.

आयुर्वेद अभ्यासक्रम चालविणा-या संस्थेने २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी शुल्क मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला. संस्थेने प्रति विद्यार्थी रुपये १,७९,३५२/- शुल्क प्रस्तावित केले आहे आणि दावा केला आहे. दि.१८.०९.२०२४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत या प्रस्तावावर विचार करण्यात आला. प्रस्तावाच्या समर्थनार्थ सादर केलेल्या प्रस्तावाचा आणि पुराव्यांचा योग्य विचार करुन प्राधिकरणाने रुपये १,१६,०००/- शुल्क मंजूर केले आहे. नाराज होऊन संस्थेने पुनर्विलोकन अर्ज दाखल केला आहे.

संस्थेचे प्रतिनिधित्व करणा-या अधिका-यांचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि कागदपत्रांची छाननी केल्यानंतर पुनर्विचार अर्ज अंशतः मंजूर करण्यात यावे असे ठरविण्यात आले. संस्थेचे शुल्क खालीलप्रमाणे सुधारित केले आहे :

| पुनर्विलोकन अर्ज क्र | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केलेले सुधारित शुल्क |
|---|---|---|---|
| ११६/ २०२४ | राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आयुर्वेद मेडिकल कॉलेज ॲन्ड रिसर्च सेंटर, अहमदनगर **कोड क्र.बीएएमएस०३१८४** | आयुर्वेद | १,३२,०००/- प्रति विद्यार्थी |

(११) **पुनर्विलोकन अर्ज क्र.१२३/२०२४ (कोड क्र.बीएएमएस००१८) किसन ज्ञानोदय मंडळ गुढे यांचे आयुर्वेद महाविद्यालय, चाळीसगांव, जळगांव** संस्थेने चालविलेल्या आयुर्वेद अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१. श्री.हरिश्चंद्र उत्तनराव मुहागर, संचालक

२.डॉ.उत्तमराव महाजन, अध्यक्ष

३. श्रीमती रेखा पाटील, लेखापाल

म्हणणे ऐकले.

आयुर्वेद अभ्यासक्रम चालविणा-या संस्थेने २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी शुल्क मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला. संस्थेने प्रति विद्यार्थी रुपये २,५०,०००/-. शुल्क प्रस्तावित केले आहे आणि दावा केला आहे. दि.२०.०९.२०२४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत या प्रस्तावावर विचार करण्यात आला. प्रस्तावाच्या समर्थनार्थ सादर केलेल्या प्रस्तावाचा आणि पुराव्यांचा योग्य विचार करुन प्राधिकरणाने रुपये १,१०,०००/-. शुल्क मंजूर केले आहे. नाराज होऊन संस्थेने पुनर्विलोकन अर्ज दाखल केला आहे.

संस्थेचे प्रतिनिधित्व करणा-या अधिका-यांचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि कागदपत्रांची छाननी केल्यानंतर पुनर्विचार अर्ज अंशतः मंजूर करण्यात यावे असे ठरविण्यात आले. संस्थेचे शुल्क खालीलप्रमाणे सुधारित केले आहे :

| पुनर्विलोकन अर्ज क्र | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केलेले सुधारित शुल्क |
|---|---|---|---|
| १२३/२०२४ | किसन ज्ञानोदय मंडळ गुढेज आयुर्वेद महाविद्यालय, चाळीसगांव, जळगांव **कोड क्र.बीएएमएस००१८** | आयुर्वेद | १,३५,०००/- प्रति विद्यार्थी |

(१२) **पुनर्विलोकन अर्ज क्र.१३६/२०२४ (कोड क्र.बीएएमएस००२७) ज्युपिटर आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, खामला रोड, नागपूर** संस्थेमध्ये चालविलेल्या आयुर्वेद अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१. श्रीमती तारिणी निखारे, सचिव

म्हणणे ऐकले.

आयुर्वेद अभ्यासक्रम चालविणा-या संस्थेने २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी शुल्क मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला. संस्थेने प्रति विद्यार्थी रुपये २,४५,५००/-. शुल्क प्रस्तावित केले आहे आणि दावा केला आहे. दि.२०.०९.२०२४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत या प्रस्तावावर विचार करण्यात आला. प्रस्तावाच्या समर्थनार्थ सादर केलेल्या प्रस्तावाचा आणि पुराव्यांचा योग्य विचार करुन प्राधिकरणाने रुपये १,४९,०००/-. शुल्क मंजूर केले आहे. नाराज होऊन संस्थेने पुनर्विलोकन अर्ज दाखल केला आहे.

संस्थेचे प्रतिनिधित्व करणा-या अधिका-यांचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि कागदपत्रांची छाननी केल्यानंतर पुनर्विचार अर्ज अंशतः मंजूर करण्यात यावे असे ठरविण्यात आले. संस्थेचे शुल्क खालीलप्रमाणे सुधारित केले आहे :

| पुनर्विलोकन अर्ज क्र | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केलेले सुधारित शुल्क |
|---|---|---|---|
| १३६/२०२४ | ज्युपिटर आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, खामला रोड, नागपूर **कोड क्र.बीएएमएस००२७** | आयुर्वेद | १,६०,०००/- प्रति विद्यार्थी |

(१३) **पुनर्विलोकन अर्ज क्र.१३८/२०२४ (कोड क्र.बीएएमएस००४४) सौ.शांतादेवी वेदप्रकाश पाटील आयुर्वेद कॉलेज ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयुट, हट्टा, हिंगोली** संस्थेमध्ये चालविलेल्या आयुर्वेद अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्राधिकरणाने निर्धारित केलेले शुल्क अमान्य असल्यामुळे त्यांनी कायद्याचे कलम १४ च्या पोटकलम (ड) नुसार पुनर्विलोकन अर्ज दाखल केला होता.

खालील उपस्थित होते :

१.श्री.माणिकराव कुलकर्णी, प्राचार्य

म्हणणे ऐकले.

सुनावणीनंतर संस्थेच्या अधिका-यांनी पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची विनंती केली.

पुनर्विलोकन अर्ज मागे घेण्याची परवानगी दिली. पुनर्विलोकन अर्ज मागे घेतल्याने निकाली काढण्यात आला आहे.

विषय क्र.३: **२०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांसाठी शुल्क मंजुरीसाठी प्रलंबित प्रस्तावांवर विचार करणे**

२०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी शुल्क मंजुरीसाठी प्रलंबित प्रस्तावांवर विचार करण्यासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात यावी, असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत.

विषय क्र.४: **२०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी शुल्काच्या नो अपवर्ड रिव्हिजन संदर्भात विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांकडून मिळालेल्या सूचना विचारात घेणे**

सदरील विषय "भाग २" मध्ये वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

विषय क्र. ५: **दिनांक २५.०२.२०२५ रोजी माननीय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तावर चर्चा करण्यासाठी खालीलप्रमाणे:**

अ. **दिनांक ०६.०३.२०२५ रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या डेस्क अधिका-यांकडून प्राप्त पत्राबाबत जे एन.आर.आय. आणि व्यवस्थापन कोटयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आकारल्या जाणा-या शुल्कासंदर्भात आहे.**

सर्व संबंधितांशी चर्चा करुन या विषयावर पुढील बैठकीत निर्णय घेण्यात यावा असे ठरविण्यात आले.

**ब. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क नियमन) कायदा, २०१५ कायदा, २०१५ च्या तरतुदीनुसार प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) आणि शुल्क नियमन प्राधिकरण (एफआरए) तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत महाराष्ट्र राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या कक्ष अधिका-याकडून दिनांक २१.०३.२०२५ चे पत्र**

प्राधिकरणाच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, शासन निर्णय दिनांक २१.०३.२०२५ प्रमाणे शुल्क नियामक प्राधिकरण, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष व शुल्क नियामक प्राधिकरणासाठी नियम व विनियम करण्यासाठी समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात येऊन श्री.राजेंद्र भागवत, से.नि.प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आल्यामुळे शुल्क नियामक प्राधिकरणासाठी वेगळी समिती स्थापन करण्याची आवश्यकता नसल्याचे निदर्शनास आले. या अनुषंगाने वेगळी समिती स्थापन करण्याची आवश्यकता नसल्याचे ठरविण्यात आले. मा.सदस्य सचिव हे सदर समितीचे सदस्य असल्याने प्राधिकरणाच्या सदस्यांना याबाबत काहीही सूचना असल्यास लेखी स्वरुपात सादर करण्यात याव्या, जेणेकरुन सदर सूचना समितीच्या विचारार्थ सादर करणे शक्य होईल.

**विषय क्र. ६: तक्रार निवारण उपसमितीच्या इतिवृत्ताचा विचार करुन निर्णय घेण्यासाठी**

संबंधित विषय पुढील बैठकीत घेण्यात यावा, असे ठरविण्यात आले.

दिनांक : २६ मार्च, २०२५
ठिकाण : मुंबई

(डॉ.अर्जुन चिखले, भा.प्र.से.)
सदस्य सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य